# प्रकरण तिसरे

## मुक्ती संघर्ष चळवळ - एक चळवळ

## प्रकरण तिसरे

## मुक्ती संघर्ष चळवळ - एक वेगळेपण

### 3·1 खानापूर तालुक्यातील राजकीय प्रवाह :-

बळीराजा स्मृती धरणाच्या उभारणीमध्ये खानापूर तालुक्यातील चळवळींचा महत्त्वाचा वाटा आहे· प्रामुख्याने या तालुक्यातील मुक्ती संघर्ष चळवळीच्या सहभागामुळेच धरणनिर्मिती झाली आहे· सन 1982 पासून खानापूर तालुका आणि सांगली जिल्हयाच्या राजकारणावर मुक्ती संघर्ष चळवळीचा मोठा प्रभाव आढळतो· डाव्या विचारसरणीची ही चळवळ असून खानापूर तालुक्यातील जनतेच्या विविध प्रश्नांशी ती एकरूप झालेली आहे· कोणत्याही राजकीय पक्षांशी बांधिलकी नसणारी ही चळवळ पुरोगामी विचार आणि वैज्ञानिक दृष्टिकोणाचा प्रचार व प्रसार करणारी अशी संघटना आहे· या संघटनेने आपल्या अस्तित्वाने सांगली जिल्हयातील प्रस्थापित राजकीय पक्षांना काही प्रमाणात शह देण्याचा प्रयत्न केलेला आहे·

सांगली जिल्हा हा स्वातंत्र्य चळवळीपासून आजपर्यंत काँग्रेसचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो· येथील जनतेने राज्याला खंबीर नेतृत्व दिले तसेच येथील नेतृत्वाने येथील जनतेच्या खंबीर पाठिंब्यावर देशपातळीवरील राजकारणात आपला दबदबा निर्माण केला होता· स्वातंत्र्य प्राप्तीनंतर जिल्हयात डाव्या व पुरोगामी विचारांचे (शे·का·प, जनता दल, कम्युनिस्ट) पक्ष आपला प्रभाव राखून आहेत· जिल्हयात जातीयवादी पक्षांचे अस्तित्व काही प्रमाणात असले तरी ते अगदी नगण्य स्वरूपात आहे· या जिल्हयाला प्रतिसरकार आणि नाना पाटलांच्या विचारांची परंपरा आहे· येथे डावे पक्ष त्यांच्या विचारांची पताका घेवून कार्यरत असताना जनतेने पुरोगामी विचारांच्या मुक्ती संघर्ष चळवळीला आपलेसे करून घेतलेले आहे· या चळवळीमध्ये व येथील डाव्या विचारांच्या राजकीय पक्षांच्यामध्ये वेगळेपण काय आहे हे प्रस्तुत प्रबंधिकेच्या निमित्ताने अभ्यास करणे

महत्त्वाचे आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर खानापूर तालुक्याच्या राजकारणात काँग्रेस, शे.का.पक्ष, जनता दल, भाजप, शिवसेना, भारिप, कम्युनिस्ट इ.पक्षाचे अस्तित्व आहे. आजपर्यंतच्या तालुक्यातील निरनिराळ्या निवडणूकात काँग्रेस व शेतकरी कामगार पक्षाचा प्रभाव प्रामुख्याने आढळतो. हा तालुका राजकीयदृष्टया जागरूक असला तरी जिल्हयातील सत्ताधारी मंडळींच्या सत्ता स्पर्धेच्या राजकारणामुळे हा प्रदेश राजकीय सत्ता आणि विकासापासून दुर्लक्षित राहिलेला आहे.

अ. **काँग्रेस पक्ष :-**

महाराष्ट्राचे शिल्पकार कै.यशवंतराव चव्हाण यांची जन्मभूमी म्हणून बळीराजा परिसर ओळखला जातो. यशवंतराव चव्हाण यांचा जन्म खानापूर तालुक्यातील देवराष्ट्रे या गावात 12 मार्च 1913 ला अत्यंत गरीब शेतकरी कुटुंबात झाला.[1] त्यांचे प्राथमिक शिक्षण येथेच झाले. भाळवणी, ढवळेश्वर, विटे व देवराष्ट्रे ही कै.यशवंतराव चव्हाण यांच्या संदर्भातील गावे म्हणून ओळखली जातात. विटयातील सेंट्रल स्कूलमध्येही त्यांनी काही काळ शिक्षण घेतले होते.[2] त्यांच्या समवेत या तालुक्यातील अनेक कार्यकर्त्यांनी स्वातंत्र्य चळवळीचे कार्य केले होते. त्यामुळेच यशवंतरावाचा प्रभाव येथील जनतेवर मोठया प्रमाणात आढळतो. कै.चव्हाणांचे अनेक सच्चे कार्यकर्ते त्यांच्या विचारांची पताका खांद्यावर घेवून तालुक्यात कार्य करीत आहेत. परंतु आज त्यांची परवड चालली आहे.

कै.यशवंतराव चव्हाण आणि कै.वसंतराव दादांच्या विचाराने व कार्यामुळे हा तालुका प्रभावित होऊन काँग्रेसचा बालेकिल्ला झाला आहे. तालुक्याच्या सत्ता स्पर्धेत काँग्रेसला सत्तेची सर्व पदे प्राप्त झाली आहे. येथील जनताही राष्ट्रीय प्रवाहाबरोबर राहून काँग्रेस पक्षाला सत्तास्थानी बसविले आहे. महाराष्ट्र राज्य निर्मितीनंतर तालुक्यात काँग्रेस अंतर्गत संपतराव माने व विठ्ठलराव देशमुख (माहुलकर दादा) हे दोन गट प्रभावी होते. प्रामुख्याने 1980 पर्यंत या दोन्ही गटांनी एकमेकांना शह देत तालुक्याची राजकीय सत्तास्थाने उपभोगली आहेत. माने गटाने जिल्हा नेतृत्वाच्या मदतीने तालुक्यावरील आपली पक्कड घट्ट केल्यामुळे 1980 नंतर तालुक्याच्या राजकारणातून माहुलकरदादा गट बाजूला फेकला गेला. परंतु विटयाचे हणमंतराव पाटील यांनी आपला गट प्रभावी करून कार्य

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

ठिकाणी माने गटाला शह देण्याचा प्रयत्न केला· विटा नगरपालिकेवर पाटील गटाची प्रथमपासून सत्ता आहे·

सध्या तालुक्यात आ·अनिल बाबर, आ·पतंगराव कदम, किरण माने, संपतराव देशमुख आणि हणमंतराव पाटील यांचे काँग्रेस अंतर्गत गट प्रामुख्याने कार्यरत आहेत· शहाजी बापू पाटील, बबनराव (भाऊसाहेब) यादव, लालासाहेब यादव, मोहनराव कदम, ॲड·सदाशिवराव पाटील, शिवाजीराव कदम, रविंद्र देशमुख, रामराव शिंदे, आबासाहेब देशमुख इ·नेतेमंडळी काँग्रेस पक्षाचे कार्य करीत आहेत· कै·संपतराव माने यांनी सांगली जिल्हा परिषदेचे अध्यक्ष म्हणून काही वर्षे काम पाहिले होते· तर सांगली जिल्हा परिषदेच्या अर्थ व शिक्षण खात्याच्या सभापतीपदाची धुरा काही वर्षे संपतराव देशमुख यांनी यशस्वीपणे सांभाळली होती·

तालुक्यातील जनता सतत काँग्रेसच्या पाठिशी खंबीरपणे उभी असली तरी नेते मंडळींनी आपल्या सत्तेचा वापर मात्र एकमेकांचे खच्चीकरण करण्यासाठीच केलेला आढळतो· त्यामुळे तालुक्याचा योग्य प्रमाणात विकास झाला नाही· तालुक्यातील दुष्काळ, औद्योगिक विकास, बेकारांचा प्रश्न, रोजगाराचा प्रश्न, तालुक्यातील जनतेच्या अत्यंत निकडीचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, शेतीसाठी पाणीपुरवठा, शिक्षण इ·जनतेचे प्रश्न सोडविण्यात येथील काँग्रेस नेते मंडळी अयशस्वी ठरलेली आहेत· येथील दुबळ्या पक्ष नेतृत्वामुळे व पक्षातील घृणास्पद गटबाजीमुळे शासकीय योजनांचा लाभ येथील जनतेला योग्य प्रमाणात मिळाला नाही· याचाच अर्थ असा की, तालुक्यात काँग्रेस हा कायम सत्ताधारी पक्ष असला तरी जनतेच्या प्रश्नांची सोडवणूक करणारे कार्य त्याच्याकडून पुरेशा प्रमाणात झालेले नाही असे नाईलाजाने म्हणावे लागते·

### ब· <u>डावे पक्ष</u> :-

खानापूर तालुका क्रांतिसिंहाची कर्मभूमी म्हणून ओळखला जातो· या तालुक्यात म·फुले, शाहू महाराज, डॉ·आंबेडकर, नाना पाटील यांच्या विचारांचा प्रभाव आढळतो· तालुक्यात शे·का·पक्षाचा प्रभाव प्रथमपासूनच आहे· काही काळ काँग्रेसला पर्यायी पक्ष म्हणून या पक्षाने आपले स्थान भक्कम केले होते· 1957 च्या निवडणूकीत शे·का·प· चे कार्यकर्ते आणि संयुक्त महाराष्ट्र समितीचे उमेदवार भाई भगवानराव

मोरे §बप्पा§ यांची खानापूर विधानसभा मतदार संघातून जनतेने निवड केली होती. तसेच 1972 च्या विधानसभेच्या चुरशीच्या निवडणूकीत शे.का.प. चे उमेदवार भाई संपतराव पवार यांना येथील जनतेने भरघोस मते दिली. काँग्रेसचे उमेदवार संपतराव माने यांचा या निवडणूकीत निसटता विजय झाला. शे.का.पक्षाच्या उमेदवाराचा या निवडणूकीत पराभव झाला असला तरी जनतेने डाव्या पक्षाच्या एका नवोदित युवक नेत्याला दिलेला प्रचंड पाठिंबा कौतुकास्पद होता. तसेच पुरोगामी विचारांच्या पक्षावर दाखविलेला विश्वास अभिमानास्पद म्हणावा लागेल. या निवडणूकीतून संपतराव पवार या नवोदित युवक कार्यकर्त्यांचे नेतृत्व तालुक्याच्या डाव्या विचारांच्या चळवळीत पुढे आले. या तालुक्यात शे.का.पक्ष हा प्रमुख विरोधी पक्ष म्हणून बराच काळ आपला प्रभाव व अस्तित्व राखून आहे. या पक्षात प्रामुख्याने भगवानराव मोरे §बप्पा§, सदाशिवराव पवार, भगवानराव सुर्यवंशी, भगवान सव्वाशे, संपतराव पवार, भिमराव सुर्यवंशी, रावसाहेब शिंदे इ.नेतेमंडळी कार्य करीत आहेत.

शे.का.पक्षाने तालुकयातील शेतक-यांच्या प्रश्नासाठी लोकशाही मार्गाने सतत संघर्ष चालू ठेवला आहे. त्यात प्रामुख्याने शेती मालाला योग्य भाव, जनावरांना वैरणी, पिण्याचे पाणी, शेतीपंपाना वीज आणि विजेचे दर, शेतक-यांची तगाई माफ करणे बेरोजगारांचा प्रश्न, बेकारी, दुष्काळ निर्मूलन अशासारख्या प्रश्नांसाठी लोक आंदोलन उभारण्याचा प्रयत्न केला आहे. जनतेच्या प्रश्नाला वाचा फोडण्याचे व शेतक-यांना त्यांचे न्याय्य हक्क प्राप्त करून देण्यासाठी या पक्षाने अनेक वेळा लढा उभारला आहे.

अशा पध्दतीने शे.का.पक्षाने जनतेच्या प्रश्नासाठी मोर्चे, धरण, उपोषण, घेराव या मार्गाचा वापर करून शासनाशी संघर्ष करून विरोधी पक्षाची भूमिका पार पाडली आहे. परंतु तालुक्यातील जनतेच्या विकासासाठी स्वतःहून काही विकास योजना राबविण्याचा प्रयत्न केलेला नाही. अलिकडच्या काळात तालुक्यातील या पक्षाच्या कार्यकर्त्यामध्ये नेतृत्व स्पर्धेच्या राजकारणातून एकमेकांना संपविण्याचे प्रयत्न झाले. नेत्यांच्यामधील हेवेदावे, मतभेद विकोपाला जाऊन काहींनी वेगळी चूल मांडण्याचा तर काही मंडळींनी सत्ताधारी पक्षाचा आश्रय घेतल्याचे चित्र पहावयास मिळते. नेते मंडळीतील अंतर्गत हेवेदावे, वैचारिक मतभेद, घृणास्पद नेतृत्व स्पर्धा आणि संधीसाधू राजकारण वृत्ती यामुळे हा पक्ष आज मरणःप्राय अवस्थेत आहे. परंतु याचे कोणालाही सोयरसुतक नाही. म्हणजेच

तालुक्यातील जनतेने कॉंग्रेसला पर्याय म्हणून मोठया अपेक्षेने शे·का·पक्षाकडे लक्ष केंद्रित केलेले होते· परंतु शे·का·पक्षानेही येथील जनतेचा भ्रमनिरास करून आपणही त्याच माळेतील एक मणी आहोत हे दाखवून दिले आहे·

खानापूर तालुक्यात जनता दल, कम्युनिस्ट पक्ष, भारिप सारखे डाव्या विचारसरणीचे पक्ष अस्तित्वात आहेत परंतु त्यांचे अस्तित्व फक्त निवडणूक काळातच जाणवते·

एकंदरीत या तालुक्यातील सत्ताधारी व विरोधी पक्षांनी फक्त निवडणुका जिंकण्यासाठी आपल्या जाहिरनाम्यात व भाषणातून जनतेच्या प्रश्नांची दखल घेतलेली आहे· प्रत्यक्षात मात्र कोणीही त्या प्रश्नांची, समस्यांची सोडवणूक करण्यासाठी तळमळीने प्रयत्न केल्याचे दिसत नाही·

अलिकडच्या काळात तालुक्यात मुक्ती संघर्ष चळवळीने आपल्या अस्तित्वाने सर्व राजकीय पक्षांना विचार करावयास लावले आहे· राजकीय पक्षांच्या भूमिकेने भ्रमनिरास झालेल्या जनतेला मुक्ती संघर्ष चळवळीने प्रभावित केले आहे· या चळवळीकडे जनता आशेचा एक किरण म्हणून मोठया अपेक्षेने आकर्षित झालेली आहे· अशा या चळवळीत वेगळेपण काय आहे त्याचा आढावा घेणे महत्वाचे आहे·

## 3·2 मुक्ती संघर्ष चळवळ :-

### अ· मुक्ती संघर्ष चळवळीचा उदय :-

खानापूर तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे येथील बरीचशी मंडळी उदरनिर्वाहासाठी मुंबईला स्थलांतरित झालेली होती· त्यापैकी बहुसंख्य कापड गिरण्यामध्ये कामगार होते· परंतु 1982 साली गिरणी कामगारांचा मोठा संप झाला आणि या लोकांचे संसार उद्ध्वस्त झाले· मुंबईमध्ये जीवन जगणे कठीण झाले· संपाने बेकार झालेल्या या मंडळीपुढे गावाकडे जावे तर भीषण दुष्काळ, इथे थांबावे तर उपासमार अशा परिस्थितीत जायचे कुठे, असा यक्ष प्रश्न या दुष्टचक्रात अडकलेल्या संपकरी मंडळीपुढे उभा राहिला· शेवटी नाईलाजाने ही मंडळी आपापल्या गावी परतली· दुष्काळाने जर्जर झालेल्या येथील कुटुंबावर या संपकरी मंडळीचा आणखी बोजा पडला· उदरनिर्वाहाचा मोठा प्रश्न निर्माण झाला· दुष्काळाने तर या परिसरात कायमचे घर केले होते· शासन दुष्काळ हटविण्यास व दुष्काळावर उपाय योजना करण्यास असमर्थ ठरले होते· "कुणीतरी दुष्काळ घालविल",

या आशेने राहिले तर संपूर्ण जीवन उदध्वस्त झाल्याशिवाय राहणार नाही यासाठी काहीतरी उपाय शोधला पाहिजे, संघटना बांधली पाहिजे असा विचार येथील दुष्काळग्रस्त जनता व संपकरी गिरणी कामगार यांच्यात निर्माण झाला.[3]

संपकरी गिरणी कामगार आणि तालुक्यातील दुष्काळग्रस्त जनता यांनी एकत्रित येवून गिरणी कामगारांचा संप, संपाचा लढा, कामगारांचा लढा, दुष्काळी भागातील रोजगार हमी योजनेतील मजूरांचा, त्यांच्या अधिकारांचा आणि हक्काचा लढा एकत्रितपणे चालविण्याचा निश्चय केला. स्वातंत्र्यलढयात या परिसरातील लोकांनी प्रतिसरकार स्थापन करून स्थानिक पातळीवरील लोकांचे राज्य निर्माण करण्याचा यशस्वी प्रयत्न केलेला होता. त्याच पध्दतीने स्वातंत्र्योत्तर काळात लोकांच्या अधिकाराची चळवळ उभी करण्याचा निश्चय करण्यात आला. 1942 च्या प्रतिसरकारची परंपरा घेऊन दुष्काळ हटविणारी आणि राबणा-या स्त्री-पुरूषांच्या शोषणमुक्तीसाठी संघटना निर्माण करण्याचे ठरले.[4] त्यासाठी भैरवनाथ वसतिगृह" विटा, ता.खानापूर येथे 28 ऑक्टोबर 1983 रोजी स्वातंत्र्यसैनिक, गिरणी कामगार, दुष्काळपीडित जनता आणि कार्यकर्ते यांची एक बैठक घेतली आणि या बैठकीतच ऐतिहासिक अशा "मुक्ती संघर्ष समिती"ची स्थापना करण्यात आली. या बैठकीस स्वा.सै.डी.जी.देशपांडे, भगवानराव मोरे, क्रांतिअग्रणी जी.डी.लाड, आचार्य शांताराम गरूड, गं.प्र.प्रधान, नागनाथ नायकवडी यांचा सक्रिय पाठिंबा होता. या बैठकीस श्रीमती इंदुताई पाटणकर, भगवानराव सव्वाशे, बाळकृष्ण (आणा) मोहिते यांच्यासह अनेक स्वातंत्र्यसैनिक उपस्थित होते. डॉ.भारत पाटणकर, रावसाहेब शिंदे, संपतराव पवार, जयंत निकम, अरूण माने, शलाका पाटणकर, डी.वाय.मोरे इ.कार्यकर्ते उपस्थित होते. मुंबई गिरणी कामगारांचे प्रतिनिधी शहाजी शिंदे, महादेव हदवे, सुरेश पवार, तानाजी पवार, संदी, (भाळवणी) देवबा काकडे, अशोक सुर्यवंशी (वेलवडे) कै.दत्तात्रय भगत (खानापूर) हे सहभागी झालेले होते.

मुक्ती संघर्ष चळवळीच्या स्थापनेनंतर नागमणीराव (दिल्ली), के.जे.जॉय (केरळ), जयवंत भोसले (सांगली), शंकर पाटील (कासेगाव), गणपतराव घांगरे, भानुदास कोकरे, नारायण आप्पा मोरे, तानाजी मोहिते, एकनाथ माने, रंगराव निकम, रामचंद्र निकम, राजाराम ननवरे, बाळकृष्ण मोहिते (खरेमामा), धनाजी माने, सिताराम

शिंदे, विलास चव्हाण, पांडूरंग चव्हाण, मारुती जाधव, दिनकर कास्कर, रघुनाथ पवार, सखुबाई सावंत, विमल पाटील, बंडू भाऊ पवार, देवकुमार दुपटे, लक्ष्मण दुपटे, के·यशवंत दुपटे, सुशिला दुपटे, शीलाबाई चव्हाण, जैतुनबी शिकलगार, किसन रामचंद्र पवार, बबन फुके, ज्ञानदेव शिंदे, रामचंद्र शिंदे, आण्णाभाऊ जाधव, संभाजी जाधव, एकनाथ अतीतकर, काशीनाथ शिंदे, रहिमानभाई दगडू शिकलगार, अशोक जाधव, सर्जेराव पाटील, मोहन जाधव यांच्यासह तालुक्यातील अनेक कार्यकर्त्यांनी समितीच्या कार्याला वाहून घेतले·[5]

मुक्ती संघर्ष चळवळीची उभारणी गिरणी कामगारांच्या उठावाच्या आधारावर उभी केलेली आहे· त्यामुळे स्थानिक पातळीवरील राजकीय रचना, त्यांचा आधार व त्यांच्या पाठिंब्याचा प्रश्न उपस्थित झाला नाही· या तालुक्यातील लोक स्वयंस्फूर्तीने यामध्ये सहभागी झाले· या समितीमुळे संपकरी गिरणी कामगार आणि दुष्काळग्रस्त लोक संघटित झाले· मुक्ती संघर्ष चळवळ म्हणजे कामगार, शेतमजूर, शेतकरी स्वातंत्र्य चळवळ होय· या वर्गाच्या स्वातंत्र्यासाठी आणि हक्कांसाठी संघर्ष करणारी ही चळवळ असून ती डाव्या आघाडीचे मोठे व्यासपीठ बनले आहे· या चळवळीने "शोषित शेतकरी कामगार मुक्तीसंघर्ष क्रांतिसिंह मुक्त व्यासपीठ" या नावाने आपले कार्य सुरु केले आहे· सर्वसाधारणपणे या चळवळीला "श्रमिक मुक्ती दल" किंवा सर्वार्थाने रुढ असलेले "मुक्ती संघर्ष चळवळ" असेच संबोधले जाते· मुक्ती संघर्ष चळवळ म्हणजे "मार्क्सवादी विचारांच्या कार्यकर्त्यांचा एक गट आहे, तो राजकीय पक्ष नव्हे" असे डॉ·भारत पाटणकर यांनी आपल्या मुलाखतीत स्पष्ट केले·

1982 पूर्वी खानापूर तालुक्यात राजकीय पक्ष, संघटना कार्यरत होत्या· परंतु शेतक-यांची स्वतंत्र अशी संघटना नव्हती· मुक्ती संघर्ष चळवळीच्या स्थापनेमुळे शेतक-यांची स्वतंत्र अशी कार्य करणारी संघटना कार्यरत झाली· या चळवळीचे वेगळेपण सांगली जिल्हयाच्या राजकारण, समाजकारणात जाणवते:

1· <u>डॉ·भारत पाटणकर</u>

डॉ·भारत पाटणकर आणि मुक्ती संघर्ष चळवळ यांचे अतूट नाते आहे· मुक्ती संघर्ष चळवळीच्या उभारणीत त्यांचा सिंहाचा वाटा आहे· तसेच बळीराजा स्मृती

धरणाचे प्रेरक व विचारवंत म्हणूनही त्यांचे स्थान महत्त्वपूर्ण आहे·

डॉ·भारत पाटणकर हे वाळवा तालुक्यातील कासेगावचे तरूण कार्यकर्ते आहेत· द·सातारा जिल्हयातील स्वातंत्र्य चळवळीत आघाडीवर असणा-या थोर स्वातंत्र्यसैनिक कै·बाबूजी पाटणकर व श्रीमती इंदुताई पाटणकर यांचे हे सुपुत्र असून लहानपणापासूनच त्यांच्यावर देशभक्ती आणि राष्ट्रनिष्ठेचा प्रभाव पडलेला आढळतो· प्रतिसरकारमध्ये डॉ·भारत पाटणकरांच्या माता-पित्यांचे कार्य महत्त्वपूर्ण तर होतेच शिवाय त्यांच्या कुटुंबाला सामाजिक कार्याचीही परंपरा लाभलेली आहे· भारत पाटणकरांनी वैद्यकीय शास्त्रातील पदवी प्राप्त करूनही स्वतःच्या आणि कुटुंबाच्या प्रगतीकडे लक्ष न देता विद्यार्थीदशेपासूनच सामाजिक कार्याला वाहून घेतले आहे· डॉ·पाटणकर हे तळमळीचे सामाजिक कार्यकर्ते असून त्यांच्यावर मार्क्सवादी विचारांचा मोठया प्रमाणात प्रभाव आहे· त्यांच्या समाजिक कार्याची प्रेरणा कार्लमार्क्स, डॉ·राम मनोहर लोहिया, म·फुले, राजर्षी शाहू महाराज, नाना पाटील यांच्या कार्यातून उदय पावलेली आहे·

सामान्य माणसाला दोन वेळचे पोटभर जेवण मिळावे हा त्यांच्या समाजकारणाचा केंद्रबिंदू आहे· समाजातील अज्ञान, अंधश्रध्दा, धर्मांधता, उधळपट्टी, रूढीप्रियता मागासलेपणा नष्ट होऊन बहुजन समाज सुशिक्षित व प्रगतीशील व्हावा ही त्यांच्या समाजसुधारणेमागील तळमळ आहे·

डॉ· पाटणकरांच्या आई-वडिलांनी देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी स्वतःच्या संसाराची होळी केली· देशाला स्वातंत्र्य मिळाले· परंतु ज्या शेतक-यांच्या प्रगतीसाठी या मंडळींनी स्वातंत्र्यलढयात उडी घेतली· तो शेतकरी स्वातंत्र्यानंतरही आजमितीस कंगालच झालेला आढळतो· तसेच त्याची शेतीही कंगालच झालेली आहे· अशा शेतकरी, शेतमजूर, कामगार यांना न्याय्य हक्क प्राप्त करून देण्यासाठी डॉ·पाटणकरांनी स्वतःला संघर्षात झोकून दिले आहे· यासाठी डॉ·पाटणकरांनी 1972 ते 1978 पर्यंत मुंबई येथे कामगारांच्या प्रश्नांसाठी मागोवा ग्रुपमध्ये काम केले· त्यातून धुळे जिल्हयात श्रमिक संघटना बांधून त्यांना त्यांचे न्याय्य हक्क मिळवून दिले· महाराष्ट्रात मुंबईच्या कामगार संघटनेप्रमाणे गावोगावी शेतकरी-शेतमजूरांच्या संघटना उभारण्याचा प्रयत्न केला· अशा संघटना प्रामुख्याने विदर्भ, मराठवाडा, कोल्हापूर भागात स्थापन केल्या· कामगारांच्या चळवळीत काम

करीत असताना या चळवळीला अर्थवादातून बाहेर काढून राजकीय क्रांतीकारक चळवळ उभारणीचा प्रयत्न केला. मुंबई, पुणे, बेळगाव येथे अशा संघटनेचे कार्य सध्या सुरू आहे.

शोषित शेतकरी, शेतमजूर, कामगार यांच्याशी बांधिलकी असलेले डॉ.पाटणकर 1982 च्या गिरणी कामगारांच्या संपानंतर आपल्या जन्मभूमीत म्हणजे सांगली जिल्हयात आले. जिल्हयातील संपकरी कामगार, राबणारी आणि दुष्काळग्रस्त जनता यांची संघटना बांधण्याचा प्रयत्न सुरू केला. त्यांच्या या कार्यात त्यांच्या कुटुंबाचा सक्रीय पाठिंबा असतो. त्यांच्या मातोश्री स्वातंत्र्यसैनिका श्रीमती इंदुताई पाटणकर आणि पत्नी शलाका पाटणकर या सदैव त्यांच्या बरोबरीने सामाजिक कार्यात सहभागी असतात. पाटणकर कुटुंबाची संघटनेसाठी आणि शेतकरी, शेतमजूरांच्या प्रश्नांसाठी चाललेली अखंड धडपड तसेच तळमळ वाखाणण्याजोगी आहे.

घामट रापलेल्या चेह-याने कधी कधी उपाशीपोटी राहूनसुध्दा गावा-वस्त्यातून अखंडपणे फिरती करून चळवळ उभी करण्याचा प्रयत्न सांगली जिल्हयामध्ये गेली 10-15 वर्षे डॉ.पाटणकरांनी चालविला आहे. विज्ञानयात्रा, दुष्काळी छावण्या, रोजगारहमी योजनेतील सुसूत्रता, ताकारी योजना, समान पाणी वाटप, पाणीलढा यासाठी त्यांनी चळवळीमार्फत अखंडपणे प्रयत्न सुरू ठेवलेले आहेत. प्रामुख्याने शेतकरी वर्गात वैज्ञानिक दृष्टिकोन रूजविण्यासाठी ते अत्यंत तळमळीने प्रयत्न करीत आहेत. त्यांच्या ठिकाणी असणारा प्रामाणिकपणा, निःस्वार्थीपणा, निर्मळ चारित्र्य, सत्तेच्या मोहापासून दूर राहण्याची वृत्ती यामुळे कष्टक-यांच्यामध्ये त्यांच्याविषयी आदराची भावना आहे.

म.फुल्यांच्या सत्यशोधक चळवळीची परंपरा पुढे चालविण्यासाठी हा हाडाचा तरूण कार्यकर्ता सहकुटुंब खेडयापाडयात झोपडी-पालातला घास तुकडा खाऊन राबतो आहे. आपल्या तत्वाशी बांधिलकी ठेवून रात्रंदिवस राबणा-यांच्या प्रश्नांसाठी राबत आहे. अशा या कार्यकर्त्याने व त्यांच्या सहका-यानी संपकरी व स्थानिक जनता यांची एकजूट करून मुक्ती संघर्ष चळवळीची स्थापना केली आहे.

2. **भाई संपतराव पवार** :-

भाई संपतराव पवार हे मुक्ती संघर्ष चळवळीचे दुसरे महत्त्वाचे कार्यकर्ते

आहेत. खानापूर तालुक्यातील बलवडी गावातील सधन शेतकरी कुटुंबात त्यांचा जन्म झाला असून ते पदवीधर आहेत. बळीराजा धरण उभारणीत त्यांचा सिंहाचा वाटा आहे.

भाई संपतराव पवार हे विद्यार्थीदशेपासूनच पुरोगामी विद्यार्थी संघटनेसारख्या चळवळीतून कार्य करीत होते. ते काही वर्षे पुरोगामी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष होते. क्रांतिसिंह नाना पाटलांच्या विचारांचा प्रभाव त्यांच्यावर आढळतो. नाना पाटलांच्या वयाला 75 वर्षे पूर्ण झाली त्या निमित्त विटा येथे दि.23 नोव्हेंबर 1976 रोजी क्रांतिसिंहाचा भव्य सत्कार पुरोगामी विद्यार्थी संघटनेमार्फत करण्यात आला.[6] हा सत्कार समारंभ संपतराव पवार यांनी आपल्या नेतृत्व कौशल्याने सहका-यांच्या मदतीने यशस्वीपणे पार पाडला.

भाई पवार शेतकरी कामगार पक्षाचे कार्य करीत होते. शेतकरी शेतमजूरांच्या प्रश्नासाठी तळमळीने कार्य करणा-या या तरूण कार्यकर्त्याने 1972 ची खानापूर विधानसभेची निवडणूक शे.का.पक्षाचे उमेदवार म्हणून लढविली. या निवडणूकीत त्यांनी कॉंग्रेसच्या उमेदवाराशी अत्यंत चिवटपणे झुंज दिली. या निवडणुकीत कॉंग्रेस उमेदवार के.संपतराव माने पाच हजाराच्या मताधिक्याने विजयी झाले. या निवडणूकीत संपतराव पवारांचा निसटता पराभव झाला असला तरी त्यांना मिळालेल्या प्रचंड मतांच्यामुळे तालुक्यातील तसेच जिल्हयातील कॉंग्रेस नेतृत्वाला त्यांच्या लोकप्रियतेची दखल घेणे भाग पडले. 1978 ची विधानसभा निवडणूक त्यांनी खानापूर-आटपाडी मतदारसंघातून लढविली. परंतु त्यांचे 1972 चे मताधिक्य या निवडणूकीत ब-याच प्रमाणात कमी झाले. 1985 ची विधानसभा निवडणूक त्यांनी वांगी-भिलवडी या शेजारच्या मतदार संघातून लढविली. परंतु या निवडणूकीतही त्यांना अपयश आले.

विद्यार्थ्यांचे प्रश्न, दुष्काळी छावण्या, रोजगार हमीतील सुसूत्रता, विज्ञानयात्रा, येरळेचा वाळू प्रश्न, जनावरांच्या चा-याचा प्रश्न, शासकीय योजनेतील भ्रष्टाचार, ताकारी योजना, यासाठी त्यांनी शे.का.पक्ष व मुक्ती संघर्ष चळवळीच्या माध्यमातून चळवळ केलेली आहे.

अलिकडे त्यांनी राजकीय क्षेत्रातून बाजूला होऊन मुक्ती संघर्ष चळवळीच्या माध्यमातून सामाजिक कार्याला वाहून घेतले आहे. दुष्काळ निर्मूलनासाठी सक्रीय चळवळ

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

करण्याच्या हेतूने बलवडी येथे बळीराजा स्मृती धरणाचा प्रयोग मुक्ती संघर्ष चळवळीच्या मदतीने आणि राबणा-यांच्या सहका-यातून सुरू केला. स्थानिक कार्यकर्ते म्हणून हा प्रयोग यशस्वीपणे राबविण्यात ते नेहमीच अग्रेसर राहिले. परंतु अलिकडे मुक्ती संघर्ष चळवळीचे कार्यकर्ते आणि भाई संपतराव पवार यांच्यात काही तात्विक मतभेद निर्माण झाल्यामुळे ते स्वतंत्रपणे कार्य करीत आहेत. 1992 मध्ये ऑगस्ट क्रांतीचे सुवर्ण महोत्सवी वर्ष देशभर साजरे होत असताना बलवडी येथे क्रांतिवीरांच्या स्मरणार्थ "क्रांतिस्मृतिवन" संपतराव पवारांनी उभे केले आहे. सामाजिक पर्यावरणाच्या राष्ट्रीय संतुलनासाठी मन आणि वन संवर्धन गरजेचे आहे. तरूण पिढीसमोर स्व-कृतीतून हुतात्म्यांचे स्मारक निर्माण करवून घेऊन एक प्रबोधनात्मक कार्य साकार करण्याच्या भावनेतून "ऑगस्ट क्रांतीस्मृतीवन" उभारणीचे काम संपतरावांनी सुरू केले आहे.[7]

### ब. मुक्ती संघर्ष चळवळीचे कार्य :-

खानापूर तालुक्यातील प्रस्थापित राजकीय पक्षापेक्षा अधिक महत्त्व "मुक्ती" संघर्ष चळवळीला" तिच्या कार्यामुळे प्राप्त झाले आहे. आपल्या सामाजिक, वैज्ञानिक, आर्थिक आणि राजकीय कार्यातून या चळवळीचे वेगळेपण जाणवते म्हणूनच या चळवळीच्या विधायक कार्याचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

मुक्ती संघर्षचळवळीने पुढील कार्यक्रम प्रत्यक्ष हाती घेतलेले आहेत.

### 1. रोजगार हमी योजना अंमलबजावणीसाठी प्रयत्न :-

मुक्ती संघर्ष चळवळ ही कष्टकरी, शेतकरी, शेतमजूर, कामगार यांच्या न्याय्य मागण्या व हक्क मिळवून देण्यासाठी स्थापन केली आहे. प्रामुख्याने ही चळवळ खानापूर या कायम दुष्काळी तालुक्यात कार्य करीत आहे. येथील लोकांना उपजीविकेसाठी शासनाने रोजगार हमीचे कामे चालू करावीत यासाठी प्रथम लढयाची भूमिका चळवळीने हाती घेतली. त्यामुळे ही चळवळ आपली आहे, ती आपण चालविली पाहिजे अशी बांधिलकी येथील कष्टकरी जनतेत निर्माण झाली. रोजगार हमीची कामे सतत चालू राहिली पाहिजेत, मजूरांचा पगार वेळच्या वेळी मिळाला पाहिजे, कामाच्या मापात भ्रष्टाचार होता कामा नये. यासाठी चळवळीने सतत संघर्ष केला आहे. तसेच रोजगार हमी योजनेच्या कामावर काम करणा-या मजूरांना, पाण्याची सोय, तंबू, लहान मुलांसाठी दाई व झोळणे, सकस अन्नधान्य आणि वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ही.

चळवळ सतत प्रयत्नशील राहिली. चळवळीने रोजगार हमी योजनेतील भ्रष्टाचार तर बाहेर काढलेच त्याचबरोबर चळवळीच्या रेटयामुळे दोन-दोन महिने अडलेले मजूरांचे पगार अधिकारी वर्गाला द्यावे लागले.[8]

चळवळीच्या कार्यासंदर्भात माहिती देताना चळवळीच्या जेष्ठ कार्यकर्त्या श्रीमती इंदुताई पाटणकर म्हणतात, "दुष्काळी भागात या योजनेच्या अंमलबजावणीविषयी शासनाने जेव्हा चालढकलीचे धोरण स्वीकारले तेव्हा कष्टकरी जनतेने स्वतःहून कलेक्टर कचेरीवर मोर्चा आयोजित केला. या मोर्चात कुणीही नेता किंवा पुढारी नव्हता. तालुक्यातील रोजगार हमी योजनेवर काम करणा-या मजूरांनी एक-एक रूपाया गोळा करून 500 स्त्रिया व 500 पुरूषांचा मोर्चा आपल्या न्याय्य मागण्यासाठी सांगली कलेक्टर कचेरीवर नेला. तत्कालीन कलेक्टरना कष्टक-यांनी स्वतः निवेदन दिले. कलेक्टरनी सर्व मागण्या मान्य केल्या. बंद कलेली रोजगार हमी योजनेची कामे सुरू करण्याचे आश्वासन दिले. नंतर काम चालू असल्याचे रेकॉर्ड तयार करण्यात आले. परंतु प्रत्यक्षात मात्र कामे चालू नव्हती. खेराडे विटा येथेही अशीच परिस्थिती होती. तेव्हा नाईलाजाने येथील 200 स्त्रिया व 50 पुरूषांनी सरकारी अधिका-याशिवाय प्रत्यक्ष काम सुरू केले. मजूरातील एका सुशिक्षित मजूराने मस्टर तयार केले. परंतु मजूरांनी सुरू केलेल्या कामाचा पगार देण्यास अधिकारी वर्गाने नकार दिला. पोटाची खळगी भरण्याचा प्रश्न निर्माण झाला. तेव्हा परत कष्टकरी त्वेषाने पेटून आपल्या शेळ्यामेंढयासह सरकारी कचेरीवर मोर्चा घेवून गेले. शासनाला कष्टक-यांच्या उग्र लढयामुळे नमते घ्यावे लागले. शासनाने खेराडे विटा येथील कामावर सरकारी मस्टर कारकून पाठविला तसेच लोकांनी स्वतःहून 28 दिवस केलेल्या कामाचा 68 हजार रूपयाचे पगार वाटप शासनाने केले."[9]

अशाप्रकारे चळवळीच्या अस्तित्वामुळे येथील दुष्काळग्रस्त जनतेला स्वाभिमानाने जीवन जगता आले. चळवळीने तालुक्याच्या विकासासाठी शासनाकडून काही पाझर तलाव, रस्ते, जनावरांच्यासाठी छावण्या इ. अनेक कामे करून घेतली.

### 3. दुष्काळ निर्मूलन :-

दुष्काळ आणि दारिद्र्याच्या चक्रातून मुक्त होऊ पाहणारी सर्वसामान्य गोरगरिबांची संघटना म्हणजेच "मुक्ती संघर्ष चळवळ" होय.[10]

या भागातील सर्वांना ग्रासणारा, सर्वांची दुःखे तीव्र करणारा दुष्काळाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला होता· 1972 नंतर सततच्या दुष्काळाने येथील जनता जर्जर झालेली होती· शासन व राजकीय पक्षांना दुष्काळावर कायमस्वरूपी उपाय योजना करण्याविषयी आस्था नव्हती· दुष्काळाने भयग्रस्त झालेल्या तसेच शासनाच्या दुष्काळ निवारण संदर्भातील कामचलावू उपायाने नेस्तनाबूत झालेल्या कष्टक-यांना, मुक्ती संघर्ष चळवळीच्या भूमिकेने उत्साह निर्माण झाला·

दुष्काळावर मात करण्यासाठी फक्त लढे उभारून चालणार नाही तर दुष्काळ कायमचा घालविण्यासाठी काही वेगळ्या प्रकारचा विचार व चळवळ करणे आवश्यक होते· यातूनच तालुक्याच्या नद्यांच्या अभ्यासासाठी पायी प्रवास करून विहीरींचा अभ्यास चळवळीच्या कार्यकर्त्यांनी सुरू केला· प्रथम चळवळीने पाण्याचा मार्ग, विहीरी आणि ओलिताखालील क्षेत्र यांचा शास्त्रीय अभ्यास केला· त्यावेळी या कार्यकर्त्यांना असे दिसून आले की, खानापूर तालुक्यात एकही मोठा पाणीप्रकल्प अस्तित्वात नाही· या परिसरात येरळा नदीवर येरळवाडी येथे मध्यम स्वरूपाचा प्रकल्प असून त्यातून 290 हेक्टर जमीन ओलिताखाली येते· पाटबंधारे खात्याच्या म्हणण्यानुसार आणखी दहा साधारण स्वरूपाचे प्रकल्प तालुक्यात आहेत· बलवडी येथे 1950 साली शासनाने येरळा नदीवर 460 हेक्टर जमीन ओलिताखाली आणण्याच्या उद्देशाने बंधारा बांधला परंतु प्रत्यक्षात 20 हेक्टरसुध्दा जमीन या बंधा-यामुळे ओलिताखाली येऊ शकली नाही· याशिवाय तालुक्यात 73 पाझर तलाव आहेत· या सर्व प्रकल्प आणि तलावातील पाण्यातून सरकारच्या अंदाजानुसार एकूण जमिनीच्या 8·4 टक्के इतकी जमीन ओलिताखाली आलेली आहे· परंतु मुक्ती संघर्ष चळवळीने प्रत्यक्ष या सर्व प्रकल्पांचा सर्वे केला, तेव्हा असे आढळून आले की, एकूण जमिनीच्या 2 टक्के इतके क्षेत्रही या प्रकल्पांच्यामुळे ओलिताखाली येऊ शकत नाही·[11]

अशा प्रकारची एकंदरीत खानापूर तालुक्यातील परिस्थिती होती· दुष्काळाने उग्र स्वरूप धारण केले होते· शासनाने रोजगार हमी योजनेमार्फत रस्ते बांधणे, खडी फोडणे अशासारखी जुजबी कामे सुरू केली होती· परंतु अशा प्रकारच्या कामाने कष्टक-यांच्या जीवनाचा प्रश्न सुटणार नव्हता· प्रश्न पाण्याचा होता· पाण्यामुळे दुष्काळ पडलेला होता· खडी फोडणे किंवा रस्ते बांधून दुष्काळ निश्चितच हटणार नव्हता· सर्वसामान्य जनतेला दुष्काळ हटविण्याचा हा मार्ग नव्हे, याची पूर्ण खात्री झालेली होती आणि या जाणिवेतूनच

मग दुष्काळविरोधी पर्यायाची चळवळ राबणा-यांच्या मनात आकार घेवू लागली· तालुक्यातील जनता आता,

"खडी आम्ही फोडणार नाही,
रस्ते आम्ही बांधणार नाही,
दुष्काळ घालविल्याशिवाय रहाणार नाही·"

अशा घोषणा घेऊन चळवळ करू लागली· दुष्काळ घालविणारीच कामे निघाली पाहिजेत म्हणून आग्रह धरू लागली· हे सर्व संघर्ष करत असताना मुक्ती संघर्ष चळवळीने केलेल्या सर्वेक्षणातून काही गोष्टी जास्त स्पष्ट व्हायला लागल्या·

1· आजच्या दुष्काळी भागात दुष्काळ का पडतात किंवा त्यांची तीव्रता का वाढत चालली आहे याचा अभ्यास शासनाने केलेला नाही· दुष्काळी परिस्थितीच्या मूळ व मूलभूत कारणांचा मागोवा घेण्याचा शासनाने कधीच प्रयत्न केलेला नाही·

2· दुष्काळाची कारणे शोधल्याशिवाय तो घालविता येणार नाहीच· त्यामुळे शासनाकडे दुष्काळ घालविण्याचे काडीचेही पध्दतशीर नियोजन नाही· त्यामुळे दुष्काळी परिस्थितीचा प्रश्न हाताळण्यास सरकारी यंत्रणा कुचकामी ठरलेली आहे·

3· कामगार, कर्मचारी व शेतक-यांच्याकडून रोजगार हमीसाठी जमवलेला पैसा हा प्रामुख्याने भ्रष्टाचारात आणि दुष्काळ घालवायला अजिबात उपयोगी नसणा-या कामांवर खर्च होत आहे· त्यामुळे रोजगार हमी योजनेचा दुष्काळ हटविण्यास काहीच फायदा झालेला नाही·

4· बंडिंग, सामाजिक वनीकरण, जंगल, इरिगेशन या सरकारी खात्यांच्या नियोजनात दुष्काळ घालविण्याकडे जाणारी काहीच सांगड नाही·[12]

हे शासकीय विभाग स्वतंत्ररित्या काम करीत असल्यामुळे त्यांच्यात दुष्काळ निर्मूलन कार्यक्रम राबविण्याबाबत कधीच समन्वय घडून आला नाही· त्यामुळे त्याचा असा परिणाम झाला की शासनाचे सर्व कार्यक्रम व धोरणे व्यर्थ ठरली· या गोष्टी अगदी सूर्यप्रकाशासारख्या स्पष्ट झाल्या·

यामुळेच "दुष्काळ हटविण्यासाठी पाणी अडविण्याचे काम द्या" असा चळवळीचा आग्रह होता· परंतु "पाणी अडवा पाणी जिरवा" अशाप्रकारचे धोरण असणा-या महाराष्ट्र

शासनाने कष्टक-यांना पाणी अडविण्याचे काम तर दिलेच नाही उलट ही चळवळ चिरडून टाकण्यासाठी चालू असलेली रोजगार हमी योजनेची कामे बंद केली.

या सर्व पार्श्वभूमीवर शासनाला दुष्काळ घालवायचा नसेल, त्याच्याकडे दुष्काळ घालविण्याचे नियोजन नसेल तर दुष्काळ घालविण्याचा विचार राबणा-या जनतेला स्वतःलाच केला पाहिजे त्याचे नियोजनसुध्दा तिनेच केले पाहिजे, संघर्ष करून ते अंमलात आणण्यासाठी शासनाला भाग पाडले पाहिजे असा विचार ठामपणे मुक्ती संघर्ष चळवळीने पुढे आणला.

मुक्ती संघर्ष चळवळीच्या पुढाकाराने गावोगावचे मजूर, कष्टकरी, शेतकरी आपापल्या शिवारात फिरले आणि त्यांनी स्वतःच्या योजना मांडायला सुरूवात केली. बाहेरून पाणी न जाणा-या तालुक्याच्या पूर्व भागाचा प्रस्ताव तयार झाला, ताकारी योजनेचे पाणी ऊसाला देवून व असमान वाटून मोजक्या गावांचा दुष्काळ जाण्यापेक्षा ते रेशनिंग पध्दतीने वाटावे आणि जास्तीत जास्त क्षेत्रातील खरीप-रब्बी जगवावी असा पर्याय पुढे आला. इंग्रजांच्या काळात सुरू होऊन धूळ खात पडलेले हिंगणगाव धरण पूर्ण करून त्यात आरफळ कॅनॉलचे पाणी पावसाळ्यात उचलून टाकावे. या उंचावरच्या तलावापासून सुरूवात करून पश्चिम भागातले अनेक इरिगेशन तलाव पूर्ण करावे व ते या पाण्याने साखळी पध्दतीने भरून घ्यावेत असा एक प्रस्ताव तयार झाला. बळीराजा स्मृती धरण उभारून दुष्काळ हटविण्याचा प्रत्यक्ष प्रयोग सुरू केला.[13]

अशा पध्दतीने मुक्ती संघर्ष चळवळीने दुष्काळ निर्मूलनाच्या कार्यात प्रत्यक्ष सहभाग घेतला आहे.

३. <u>बलवडी (भा.) शास्त्रीय लोकयोजना</u> :-

जनावरे हा खानापूर तालुक्यातील शेतीचा पाया आहे. जनावरांच्या ताकतीवर शेती करून आणि गाय-म्हैशीच्या दुधावर तालुक्यातील सर्वसामान्य शेतकरी जगत आहे. रोजगार, चारा, पाणी हे दुष्काळाने निर्माण केलेले अतिशय गंभीर प्रश्न आहेत. माणसे काहीना कांही करून आपल्या पोटाची खळगी भरू शकतात. त्यासाठी ते शेवटी संघर्ष करू शकतात. पण त्या मुक्या जनावरांचे काय ? त्यांच्या चा-याचे काय ? असा यक्षप्रश्न दुष्काळग्रस्त जनतेसमोर नेहमीच आ वासून उभा असतो. सरकारी तगाईतला भ्रष्टाचार, कर्जाचा बोजा आणि शेवटी गुरांना वैरण न पुरल्यामुळे त्यांची विक्री हे थांबविण्यासाठी

एक अभिनव प्रस्ताव पुढे आला." तालुक्यातील मोफत वैरणीचे कोठार बनविणारी बलवडी (भा) लोक्योजना" हाच तो प्रस्ताव होय. कष्टकरी शेतक-यांच्या जीवनाशी निगडीत असणा-या वैरणीच्या प्रश्नातून हा नवा अध्याय जनतेला मिळाला. आपले पर्याय आपणच शोधले पाहिजेत या जाणिवेतून बलवडीच्या 544 शेतक-यांनी आपली जवळ जवळ 2 हजार एकर जमीन वैरण तयार करण्यासाठी शासनाच्या ताब्यात दिली आहे. दरवर्षी ही जमीन चार महिन्यांसाठी शासनाच्या ताब्यात राहणार आहे. शासनाने स्वतः या योजने-चा सर्व्हे केला आहे. तरी गाडे पुन्हा अडून राहिले आहे. 40,000 टन ओला चारा तयार करणारी ही योजना आहे. शासनाने जाहीर केलेली वैरणीची तूट भरून काढण्याएवढी वैरण तयार करणारी योजना मुक्ती संघर्ष चळवळीने शासनाला सादर केली आहे. परंतु शासनाच्या कचखाऊ धोरणामुळे ही योजना आज कागदावरच अडून राहिली आहे.[14]

4. दुष्काळविरोधी पर्यायाचा आसूड :-

मुक्ती संघर्ष चळवळ आणि कष्टकरी जनता यांची खात्री झाली की, वारंवार दुष्काळ पडणे ही नैसर्गिक क्रिया नसून दुष्काळ हा मानवनिर्मित आहे, तो चुकीच्या नियोजनाचा भाग आहे. त्यांच्या मते दुष्काळ हा निसर्गाचा कोप नसून, शासनसत्ता आणि भांडवलवाले यांनी नियंत्रित केलेल्या कारभाराचा आणि उत्पादन व्यवहाराचा परिणाम आहे.[15]

म्हणूनच राबणारी मंडळी, इतर कामांच्यापेक्षा दुष्काळ निर्मूलनाचा एकमेव कार्यक्रम हाती घेण्याच्या अंतीम निर्णयाप्रत आली. 'मुक्ती संघर्ष चळवळीने संपूर्ण तालुका पायी फिरत, लढे चालू ठेवत आणि कष्टक-यांचे जनमत तयार करीतच "खानापूर तालुक्यातील मजूर-कष्टकरी शेतक-यांचा दुष्काळविरोधी पर्यायाचा आसूड" तयार केला.' येथील गरीबांची झुंज म.फुलेंच्या विचारावर आधारीत आहे. त्यामुळे दुष्काळ विरोधी पर्यायाचा मार्ग स्वीकारताना फुल्यांच्या आसूडाचा प्रतीक म्हणून वापर केला आहे. दुष्काळाने कोलमडून पडलेल्या जनतेला मुक्ती संघर्ष चळवळीने - " राबणा-यांनो उठा, हा दुःखाचा डोंगर आपण भुईसपाट करू या । अशा प्रकारची आर्ततेची हाक देवून संघटित केले. तसेच "संकटे विनाशकारक नसतात, तर ती विकासाचा मार्ग दाखवितात" हे पटवून देण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या मते "दुष्काळविरोधी चळवळ तीव्र करण्यासाठी व शेतीची बरबादी थांबविणारी चळवळ वाढविण्यासाठी आमची हाळी आहे" शासनाच्या चुकीच्या दुष्काळ निर्मूलन योजना आणि

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

रोजगार हमी सारखी जुजबी कामे यामुळे दुष्काळ हटणार नाही याची पूर्ण खात्री तालुक्यातील कष्टक-यांना झाली आणि म्हणूनच -

"तात्पुरत्या औषधांनी कसा तरी जीव टिकविण पुरे झाले,
रोग नाहीसा करणारे उपाय अंमलात आणू या."

या निर्णयाप्रत ही मंडळी आली आणि यातूनच 27 व 28 ऑक्टोबर 1985 रोजी विटा येथे श्री.वि.म.दांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली दुष्काळ निर्मूलन परिषद झाली. या परिषदेत पुढील धोरणात्मक मागण्या करण्यात आल्या व प्रामुख्याने शेतक-यांनी दुष्काळविरोधी पर्याय म्हणून पुढे आणले आहेत.

1. दुष्काळ निवारण व निर्मूलनाचे प्रत्येक तालुक्याचे नियोजन स्पष्ट करण्यात यावे.

2. चारा टंचाईवर मात करता येईल अशी योजना प्रत्येक तालुक्यात असावी. त्या दृष्टीने खानापूर तालुक्यासाठी बलवडी(भा.) शास्त्रीय योजना त्वरीत कार्यान्वित करावी.

3. खानापूर तालुक्यातील पूर्वभागासाठी जेथे बाहेरुन पाणी आणणे शक्य नाही तेथे त्या विभागात पाणी साठवून संरक्षण पाणी पुरवठा करणारी योजना कार्यान्वित करणेत याव्यात.

4. ताकारी योजनेचे पाणी आठमाही पीक पध्दतीने व सामाजिक न्यायाच्या तत्वाने देणेत यावे व योजनेच्या कामाचा वेग प्रत्यक्षात वाढवावा.

5. खानापूर तालुक्यातील ताकारी योजनेपासून वंचित असणा-या भागास .1.कोतवडे खिंड, .2.शामगाव खिंड, .3.औंध खिंड येथून कृष्णेचे पावसाचे पाणी उचलून खानापूर तालुक्यातील 11 इरिगेशन तलाव व 71 पाझर तलाव साखळी पध्दतीने भरुन देता येतात. या कामाची सुरुवात ताबडतोब करावी.

6. प्रत्येक तालुक्यात किमान 10 टक्के क्षेत्राचे वनीकरण करावे.

7. गेल्या चार वर्षात खानापूर तालुक्यात पडलेल्या पावसामध्ये शेतक-यांनी काढलेली कर्जे परत करण्याची क्षमता आहे का याचा शास्त्रीय अभ्यास करावा.

8· पावसाच्या पाण्याचे आधारे पूर्ण तालुक्याची पीक पध्दती नक्की करणेत यावी·[16]

हे ठराव परिषदेत संमत करून शासनाकडे पाठविले· या परिषदेस वि·रा·देऊळकर, डॉ·एस·पी·दांडे, श्री·मोरे, दत्ता देशमुख, आ·गणपतराव देशमुख, रा·भा·गुप्ते, डॉ·जय सामंत, डॉ·एम्·जी·जाधव, डॉ·ए·डी·मुळीक या मान्यवर व वेगवेगळ्या विषयातील तज्ज्ञ व्यक्तींना निमंत्रित केले होते·

या पर्यायी आसूडाची प्रत्यक्ष अंमलबजावणी मुक्ती संघर्ष चळवळीने सुरू केली· त्याचा एक प्रयोग म्हणून "बळीराजा स्मृती धरण" उभारणीस प्रारंभ झाला·

5· विज्ञानयात्रा :-

खानापूर तालुक्यात शेती हा मुख्य व्यवसाय असून तो पारंपरिक पध्दतीने केला जातो· तसेच सततच्या दुष्काळी परिस्थितीमुळे तो दिवसेंदिवस तोटयातच चालला आहे· येथील शेतकरी अशिक्षित व अंधश्रध्दाळू असल्यामुळे तो सतत कर्जाच्या विळख्यात सापडलेला आढळतो· अशा या शेतक-याची दयनीय अवस्था बदलविण्यासाठी मुक्ती संघर्ष प्रयत्न करीत आहे· त्यासाठी 1984 मध्ये तालुक्यातील 11 गावांमध्ये 10 दिवसाची विज्ञान यात्रा भरवली· त्यामध्ये दुष्काळ निर्मूलनाबरोबर लोकांना शेतीच्या संदर्भात नवीन पध्दती व तंत्रज्ञान याची माहिती देण्यात आली· लोकांना वैज्ञानिक शिक्षण आणि वैज्ञानिक दृष्टिकोण समजवून देवून परंपरागत तोटयात चालत असलेल्या शेती व्यवसायातील मूलभूत प्रश्न सोडविण्यासाठी विज्ञानाचा वापर करण्यास प्रवृत्त करणे तसेच शेती व्यवसायामध्ये जास्तीत जास्त उत्पादन घेण्यासाठी शास्त्रीय पध्दतीने शेती करण्यास प्रवृत्त करणे हा विज्ञान यात्रेचा मुख्य हेतू होता·

आज आपले आर्थिक, सामाजिक व दैनंदिन जीवन विज्ञान तंत्रज्ञानाने व्यापले आहे· पण त्या मानाने आपल्या वैचारिक व सांस्कृतिक जीवनात वैज्ञानिक दृष्टीकोण मात्र फारसा रूजलेला नाही· पारंपरिक अंधश्रध्दा मोठया प्रमाणात मूळ धरून आहेतच आणि त्याबरोबर आधुनिक विज्ञानाच्या नावाखाली जाहिरातबाजीमार्गे औषधे, खते, कीटकनाशके, सौंदर्य प्रसाधने, खाद्यपेये आदिबाबत अनेक अवैधानिक गैरसमज पसरवले जात आहेत· अशा पारंपरिक व आधुनिक गैरसमजुतींबाबत विचाराला चालना देणे, विज्ञानाचा लोकाभिमुख

प्रवाह जोपासायला मदत करणे आणि वैज्ञानिक दृष्टिकोण रूजविणे या दृष्टीने मुक्ती संघर्ष चळवळीचे कार्य स्थापनेपासून आजमितीस चालू आहे·

6· <u>ताकारी योजना</u> :-

महाराष्ट्राचे थोर नेते व सांगली जिल्हयाचे भाग्यविधाते कै·वसंतराव दादा पाटील यांनी मुख्यमंत्री पदावर असताना सांगली जिल्हयाच्या दुष्काळी भागाला वरदान ठरणारी **कृष्णा-कोयना** उपसा जलसिंचन योजना सन 1984 मध्ये सुरू केली· प्रारंभीची 83 कोटीची ही योजना आजपर्यंत 630 कोटीपर्यंत पोहोचली आहे· शासनाच्या मंद गतीच्या या योजनेच्या अंमलबजावणीच्या धोरणामुळे तिचे आज बजेट अवाढव्य वाढलेले दिसते· अत्यंत दूरदृष्टीने ही योजना दादांनी सुरु केली· परंतु त्यांच्या पश्चात त्यांच्याच पक्षाच्या नेत्यांनी हेतुपुरस्सर ही योजना रेंगाळत ठेवल्याचे दिसते· तसेच सदरच्या योजनेतील करोडो रूपयांचा चुराडा अनावश्यक आणि अनुत्पादित घटकावर करण्यात येत आहे· त्यामुळे ही योजना म्हणजे अधिकारी वर्गाला भ्रष्टाचार वाहिनीच ठरलेली आहे· अनेक जणांनी भ्रष्टाचाराचे पाणी पिऊन, स्वतः तृप्त होऊन, सामान्य जनतेला मात्र शेतीच्या पाण्यासाठी शेवटची घटका मोजावयास लावले आहे असे चित्र येथे आज दिसते·

दुष्काळी भागाचे भवितव्य ठरविणारा हा प्रकल्प जलदगतीने पूर्ण व्हावा आणि या योजनेची योग्य रीतीने अंमलबजावणी व्हावी यासाठी मुक्ती संघर्ष चळवळीने पुढाकार घेवून "ताकारी योजना कृती समिती" स्थापन केली· चळवळीच्या कार्यकर्त्यांनी या योजनेचा अभ्यास केला· ताकारी योजनेच्या विषम पाणी वाटप पध्दतीमुळे बडा बागायतदार शेतकरी अधिकच गब्बर होणार होता तर गरीब शेतकरी त्यापासून वंचित राहिला होता· ताकारी योजनेचे पाणी ऊसाला देवून व असमान वाटून मोजक्या गावांचा दुष्काळ जाण्यापेक्षा ते रेशनिंग पध्दतीने वाटावे आणि जास्तीत जास्त क्षेत्रातील खरीप-रब्बी पिके जगवावी असा पर्याय मुक्ती संघर्ष चळवळीने पुढे आणला· यासाठी "ताकारी योजना समान पाणी वाटप व प्रकल्प समिती" स्थापन करून शासनाशी लढा पुकारला· समितीने या योजनेला एक लोकशास्त्रीय पर्याय मांडला आहे· 1981 च्या जनगणनेप्रमाणे ताकारी योजनेत भिजणा-या सर्व गावांची लोकसंख्या 66,575 एवढी होती· यामध्ये 18·92 टक्के संभाव्य वाढ धरल्यास 12,596 एवढया लोकसंख्येची यात भर पडणार

आहे· ही संभाव्य वाढ धरून 1991 मध्ये 79,171 एवढी लोकसंख्या होईल· पाच माणसांचे कुटुंब धरून प्रत्येक कुटुंबाच्या तीन एकराला पाणी दिले, तर 47,502 एकर जमीन भिजेल आणि जादा 44365 एकराला पाणी देणे शक्य आहे· आपली ही भूमिका स्पष्ट करण्यासाठी मुक्ती संघर्ष समितीचे कार्यकर्ते पोस्टर प्रदर्शन, सभा, बैठका याव्दारे शेतक-यांपर्यंत जात आहेत·[17]

ताकारी योजनेचे समान पाणी वाटप आणि प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळवून देण्यासाठी चिंचणी ⟨मंगरूळ⟩ ता·खानापूर येथे दि·26/12/1990 रोजी भव्य शेतकरी परिषद घेण्यात आली· या परिषदेस मुक्ती संघर्ष चळवळीचे कार्यकर्ते, प्रकल्पग्रस्त, जेष्ठ नेते दि·बा·पाटील, डॉ·बाबा आढाव, आ·के·एल·मलाबादे, वरिष्ठ अभियंता के·आर·दाते, क्रांतिअग्रणी भाई जी·डी· तथा बापूसाहेब लाड इ·मंडळी उपस्थित होती· पाच सदस्यांचे एक कुटुंब व प्रत्येक कुटुंबास तीन एकर जमीन हे सूत्र धरून प्रत्येक तीन एकरास ताकारी योजनेचे पाणी मिळावे, ताकारी योजनेच्या फक्त आठ गावे पूर्ण भिजणा-या मूळच्या आराखडयात बदल करूनपर्यायी शास्त्रीय आराखडा स्वीकारावा, योजनेला दरवर्षी 35 कोटी रूपये खर्च करावेत, योजनेतील प्रकल्पग्रस्तांना स्टॅम्पडयुटी आधारभूत धरून जमिनीचा मोबदला द्यावा आदि ठराव ताकारी योजना समान पाणी वाटप व प्रकल्पग्रस्त समितीतर्फे आयोजित केलेल्या या परिषदेस संमत करण्यात आले·[18]

मुक्ती संघर्ष चळवळीने ताकारी योजनेच्या प्रश्नावरून सतत लढे पुकारल्यामुळे या योजनेच्या लाभक्षेत्रातील हणमंतवाडिये ता·खानापूर येथील कार्यकर्त्यांना ताकारी योजनेच्या पाणी वाटपाबाबतचे अधिकार देवून सहकारी सोसायटी स्थापन करण्यास परवानगी अलिकडच्या काळात दिलेली आहे· अशाप्रकारे शासकीय पाणीपुरवठा योजनेतील योजना पूर्ण नसताना पाणी वाटपाचे अधिकार शेतक-यांना दिल्याने हे येथील शेतक-यांच्या संघर्षाचे मोठे यश म्हणावे लागेल·

7· <u>जनता न्यायालय</u> :-

सांगली जिल्हयाला भाग्योदायिनी ठरणा-या ताकारी योजनेचे पाणी समान वाटप पध्दतीने देण्यासाठी पर्यायी आराखडा अंमलात आणावा, त्याला तत्वतः मान्यता द्यावी या मागणीसाठी "ताकारी योजना समान पाणी वाटप कृती समिती" आणि "मुक्ती

संघर्ष समिती"ने शुक्रवार दि·10 मे 1991 रोजी विटा येथे जनता न्यायालय व छावणी आंदोलन आयोजित केले होते· जनता न्यायालयाचा देशातील पहिला अभिनव प्रयोग येथे सुरू केला· या न्यायालयाचे ज्यूरी (न्यायाधीश) म्हणून पत्रकार जगन फडणीस, मुकुंदराव किर्लोस्कर, डॉ·बाबूराव गुरव, ॲड·धैर्यशील पाटील आणि ॲड·दत्ताजीराव माने यांना निमंत्रित केले होते· या न्यायालयात वादी म्हणून ताकारी योजना कृती समितीने आपल्या मागण्या सादर करून दावा गुदरला होता· तर शासनाला प्रतिवादी करून येथे हजर राहण्याचे आवाहन केले होते· शासनाने येथे उपस्थित राहून आपली बाजू मांडण्याचा प्रयत्न तर केला नाहीच उलट तत्कालीन जिल्हाधिका-यांनी अचानकपणे बंदी हुकुम आणून जनता न्यायालयाचा प्रयोग उधळून लावण्याचा प्रयत्न केला· जनता न्यायालय विटा येथे खाजगी जागेत चालू असताना प्रशासनाने प्रचंड दडपशाहीचा वापर करून डॉ·भारत पाटणकर, संपतराव पवार व कॉ·जयंत निकम यांना अटक केली· जनता न्यायालयासाठी जमलेल्या कष्टक-यांना पोलिसांनी चोहोबाजूनी घेरले· जनतेला झोडपण्याचा पोलीस खात्याचा पवित्रा आणि जिल्हाधिका-यांची आडमुठी भूमिका पाहून शेवटी आंदोलन स्थगित करण्याचा निर्णय मुक्ती संघर्ष चळवळीने घेतला· या छावण्या आंदोलनासाठी बैलगाडयासह गावोगावचे कष्टकरी विटयात जमले होते·[19]

8· **शिवाजी विद्यापीठाशी सुसंवाद** :-

मुक्ती संघर्ष चळवळीने खानापूर तालुक्यातील सततच्या दुष्काळी प्रश्नात लक्ष घालण्यासाठी शिवाजी विद्यापीठाला प्रवृत्त केले· सन 1984 मध्ये सातारा जिल्हयातील धोम येथे शिवाजी विद्यापीठाने युवक परिषद आयोजित केली होती· येथे मुक्ती संघर्ष चळवळीने तालुक्यातील कष्टकरी आणि दुष्काळग्रस्तांचा मोर्चा नेला आणि दुष्काळी भागाच्या अभ्यासाची मागणी विद्यापीठाकडे केली· त्यानंतर पत्रव्यवहार सुरू केला· चळवळीच्या कार्यकर्त्यांनी विद्यापीठात जावून प्रत्यक्ष अधिकारी वर्गाशी चर्चा करून आपली मागणी मांडण्याचा प्रयत्न केला· परंतु विद्यापीठाकडून काहीच प्रतिसाद मिळाला नाही· म्हणून 21 ऑक्टोबर 1985 रोजी "नाच गाणं बंद करा, दुष्काळाचा अभ्यास करा", दुष्काळाचे संशोधन शिवाजी विद्यापीठाने केलेच पाहिजे आदि घोषणा देत, दुष्काळाची तीव्रता गीतात व्यक्त करीत आणि भजन गात खानापूर तालुक्यातील सुमारे दोनशे दुष्काळग्रस्त शेतक-यांनी विद्यापीठावर मोर्चा नेला· विटा येथे 26 व 27 ऑक्टोबर 1985 रोजी

मोठया प्रमाणात होणा-या दुष्काळी परिषदेस शिवाजी विद्यापीठाने दुष्काळाबाबत शास्त्रीय माहिती पुरवावी, स्लाईड शो, पोस्टर प्रदर्शन भरवावे आदि मागण्या शेतक-यांनी केल्या. हंगामी कुलसचिव सुर्याजीराव साळुंखे आणि विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक आर.एस.माने यांनी मोर्चाचे निवेदन स्वीकारून या मागण्या वरिष्ठाकडे कळविण्याचे आश्वासन दिले नंतर मोर्चा विसर्जित झाला.[20]

शिवाजी विद्यापीठ कार्यकारिणी सदस्य आणि सामाजिक बांधिलकीची जाण तसेच शेतक-यांच्या प्रश्नांची आस्था असलेले प्रा.डी.यू.पवार यांनी हा प्रश्न आपल्या पातळीवर धसास लावला तसेच चळवळीच्या रेटयामुळे विद्यापीठाने आपले ज्ञान दुष्काळ निर्मूलनासाठी वापरावयाचे ठरविले. त्यासाठी "खानापूर तालुका दुष्काळ निर्मूलन समिती" विद्यापीठात स्थापन केली. राष्ट्रीय सेवा योजनेची शिबीरे दुष्काळ हटविणा-या पर्यायासाठी काम करू लागली. तसेच विद्यापीठ व मुक्ती संघर्ष चळवळ यांच्या सुसंवादातून बळीराजा स्मृती धरणाच्या रूपाने पर्यायी विकासनीतीचा प्रयोग सुरू करण्यात आला.

### 9. स्त्री मुक्ती

राजकीय पक्ष कार्यकर्ते स्त्री मुक्तीसाठी व्यासपीठावरून आकर्षक भाषणे करतात. परंतु प्रत्यक्षात मात्र त्यासाठी तळमळीने प्रयत्न करताना आढळत नाहीत. मुक्ती संघर्ष चळवळीमार्फत स्त्रियांची वेगळी चळवळ सुरू झाली. या चळवळीच्या बांधणीसाठी तालुक्यात श्रीमती इंदुताई पाटणकर, नागमणीराव, शलाका पाटणकर या महिला कार्यकर्त्यांनी पायी प्रवास केला. या चळवळीच्या स्थापनेची गरज विशद करताना श्रीमती पाटणकर यांनी सांगितले की, "रोजगार हमी योजनेवरील मस्टर कारकून तरूण मुली, विधवा या मजूर स्त्रियांच्या छेडी काढत असत. त्यांना पायबंद घालण्यासाठी, तसेच रोजगार हमी योजनेतील महिलांना पुरूषांच्या बरोबरीने समान वेतन प्राप्त करून देण्यासाठी तसेच स्त्रियांच्या इतर काही समस्या सोडविण्यासाठी चळवळीची आवश्यकता निर्माण झाली. ग्रामीण भागातील स्त्रियांच्यात जागृती निर्माण करून त्यांच्या अन्यायाला वाचा फोडण्याचे काम केल्यामुळे स्त्रियांनीच प्रत्यक्षात पुढाकार घेवून चळवळ बांधण्याची तयारी केली आणि स्त्री मुक्ती चळवळीची स्थापना करण्यात आली. सध्या या चळवळीत 700 ते 800 स्त्रियांचा प्रत्यक्ष सहभाग आहे. स्त्रियांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी मुंबई, पुणे येथील महिला कार्यकर्त्यांचे सहकार्य घेण्यात येते."[21]

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

समाजाच्या अनेक अनिष्ट रूढी, प्रथा, परंपरांच्या बेडीत अडकलेल्या स्त्रीला मुक्त करणे, स्त्रियांना समान व प्रतिष्ठेची वागणूक प्राप्त करून देणे, स्त्रियांना शिक्षण व रोजगार उपलब्ध करून देणे, "समान कामासाठी समान वेतन" या धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी ही चळवळ सतत प्रयत्नशील आहे. तसेच जिल्हयातील महिलांच्यावरील अन्याय, अत्याचाराला वाचा फोडण्यासाठी चळवळीने संघर्ष केला आहे. चळवळीमार्फत अनेक अभ्यास-शिबीरे आयोजित करून महिलाना त्यांच्या हक्काची जाणीव करून दिली जाते. तसेच महिलांना स्वाभिमानी आणि स्वावलंबी बनविण्यासाठी चळवळीमार्फत प्रयत्न केला जातो. महिलांच्या विकासासाठी, प्रगतीसाठी चळवळीमार्फत अनेक लढे उभारले आहेत.

10. परित्यक्तांचा प्रश्न :-

भारतीय समाजातील अनिष्ट रूढी, परंपरा, प्रथा यामुळे परित्यक्ता महिलांचा प्रश्न निर्माण झाला आहे. या समस्येने संपूर्ण समाजालाच ग्रासले आहे. पुरोगामी म्हणविणा-या महाराष्ट्र राज्यात तर या परित्यक्ता महिलांच्या प्रश्नांने रूद्र स्वरूप धारण केले आहे.

"परित्यक्ता स्त्री म्हणजे पतीने सोडून दिलेली स्त्री होय." अशा महिलेला पतीने सोडल्यानंतर समाजात कोणताच आधार राहत नाही. तसेच उर्वरित आयुष्य जगणेही कठीण होते. अशा स्त्रीपुढे पहिला यक्षप्रश्न उभा राहतो तो म्हणजे तिच्या उदरनिर्वाहाचा. त्यामुळे तिच्या या कमजोरीचा फायदा उपटण्यासाठी समाजात अनेक डोमकावळे टपून बसलेले असतात. समाजाचा या स्त्रीकडे बघण्याचा दृष्टीकोणही दूषित स्वरूपाचाच असतो. अशा स्त्रियांची परवड थांबविण्यासाठी तसेच त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न सोडविण्यासाठी मुक्ती संघर्ष चळवळीने परित्यक्तांची संघटना बांधली आहे. या संघटनेमार्फत परित्यक्तांचा स्वाभिमान जागृत करून त्यांना प्रतिष्ठेचे आणि हक्काचे जीवन प्राप्त करून देण्यासाठी संघर्ष चालू ठेवला आहे अशा स्त्रियांच्या उदरनिर्वाहासाठी, त्यांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी चळवळ सतत लढा देत आहे. परित्यक्तांना निर्भर व स्वावलंबी बनविण्यासाठी चळवळीमार्फत अभ्यास शिबीरे, चर्चासत्रे, मेळावे, परिसंवाद आयोजित करण्यात आले आहेत. यामधून या महिलांना त्यांच्या हक्काची जाणीव देऊन अन्याय, अत्याचार या विरूध्द पेटून उठण्याचे धाडस, धैर्य निर्माण केले जाते.

1942 च्या स्वातंत्र्यलढयात आणि प्रामुख्याने प्रतिसरकारच्या कार्यात आजच्या पुरूषांनाही लाजवेल अशा प्रकारची धाडसी आणि अत्यंत मोलाची कामगिरी केलेल्या श्रीमती इंदुताई पाटणकर या परित्यक्ता संघटनेच्या कार्यकर्त्या आहेत· त्यांनी सांगली जिल्हयातील महिला आणि परित्यक्तांचे सांगली जिल्हाधिकारी कार्यालयावर अनेक वेळा मोर्चे तसेच निदर्शने आयोजित करून या प्रश्नास वाचा फोडण्याचे महत्त्वपूर्ण काम केले आहे· श्रीमती पाटणकरांच्या मते "परित्यक्तांची ही चळवळ गरीबांची चळवळ आहे" सांगली जिल्हयात आज 50 हजार परित्यक्ता आहेत· शासकीय योजनेतून परित्यक्तांना मदत करणे हे जिल्हाधिका-यांचे काम आहे· त्यासाठी जिल्हाधिका-यांनी परित्यक्तांचा प्रश्न सोडविला पाहिजे· भारतीय संस्कृतीत स्त्रीला अत्यंत महत्त्वाचे आणि प्रतिष्ठेचे स्थान आहे· परंतु अलिकडच्या परित्यक्ता व महिलांच्या इतर काही प्रश्नांच्यामुळे स्त्रियांची ही प्रतिष्ठा तर धोक्यात आली आहेच तसेच 21 व्या शतकाकडे वाटचाल करत असलेल्या या देशात काही महिलांना आजही पशूसारखे जीवन जगावे लागत आहे·

पतीने सोडून दिल्यामुळे या परित्यक्तांना स्वतंत्रपणे रहावे लागते· अशा या परित्यक्तांची पोटगी, त्यांचे न्यायालयात विलंबाने मिळणारे निकाल, मोफत कायदेविषयक सहाय्य व सल्ला मिळविण्यात येणारे अडथळे दूर करण्यासाठी ही चळवळ कार्य करीत आहे· सांगली जिल्हयातील 15 गावांतील परित्यक्तांना शिधापत्रिका मिळवून देण्याचे काम चळवळीने केले आहे· गावातील पडीक गायरान जमिनी विकासासाठी परित्यक्तांना पुनर्वसनाच्या उद्देशाने द्याव्यात, त्यामुळे त्या स्वावलंबी बनतील, रोजगार हमीची कामे राबवावीत, लघु उद्योग निर्माण करावेत अशा मागण्या परित्यक्ता संघटनेने केल्या आहेत· यासाठी सांगली जिल्हाधिका-याकडे सतत पाठपुरावा संघटनेमार्फत करण्यात येत आहे· परित्यक्तांच्या राहण्याच्या जागेच्या प्रश्नासाठी संघटना सतत प्रयत्नशील आहे· विसापूर, वलवडी, रामापूर, आरवडे, मांजर्डे या ठिकाणी शासनाकडून जागा दाखविल्या आहेत· परंतु अद्यापी त्या जागा परित्यक्तांच्या ताब्यात मिळाल्या नाहीत· गेल्या पाच-सहा वर्षापासून प्रत्येक परित्यक्तेस दोन गुंठे जमीन मिळावी, त्यांचे पुनर्वसन करण्यात यावे यासाठी संघटना युध्द पातळीवर प्रयत्न करीत आहे· त्यासाठी सांगली जिल्हाधिकारी कार्यालयाला जिल्हयातील परित्यक्तांच्या सहा वेळा याद्या संघटनेने दिलेल्या आहेत· परंतु नाकर्त्या पतीने सोडून दिलेल्या या महिलांना आसरा देण्यास आमच्या मायबाप सरकारनेही पाऊल

अजून उचलले नाही. ही अत्यंत खेदाची तसेच संतापजनक बाब आहे असे नाईलाजाने म्हणावे लागते.[22]

11. **सामाजिक समता :-**

मुक्ती संघर्ष चळवळीने शोषित कष्टकरी जनतेची चळवळ बांधीत असताना समाजातील जातीयता मातीत गाडण्यासाठी प्रामुख्याने प्रयत्न केले. राबणारा समाज जाती-व्यवस्थेमुळे दुभंगला होता. जाती-पातीमुळे संघर्ष होऊन कष्टक-यांची शक्ती विभागली होती. श्रमिकांना न्याय हक्क प्राप्त करण्यासाठी एकसंघपणे लढा उभारणे आवश्यक होते. समाजातील जातीयतेची किड नष्ट करण्यासाठी चळवळीने समाज प्रबोधानाचे कार्य हाती घेतले. राबणा-या जनतेत जाती-पातीमुळे पडणा-या फुटीच्या विरोधात शिक्षण करणारी व शिकणारी फुले-आंबेडकर विचार यात्रा चळवळीने संघटित केली. यामधून बंधु-भाव, राष्ट्रीय एकात्मता, सहिष्णुवृत्ती, राष्ट्रप्रेम, भूतदया या विचारांची शिदोरी राबणा-यांना दिली. आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहन देवून अस्पृश्यता निवारण्यासाठी विशेष प्रयत्न केले.

भटक्या-विमुक्तांच्या प्रश्नावर चळवळ उभारण्याचे संघटनेने प्रयत्न केले. मुक्ती संघर्ष चळवळीने म.फुले, शाहू महाराज, डॉ.आंबेडकर, नाना पाटील यांचे सामाजिक सुधारणेचे व्रत स्वीकारून ही चळवळ पुढे चालविण्याचा ठाम निर्धार केला आहे. चळवळीच्या या वैचारिक बैठकीच्या प्रभावामुळे खानापूर तालुक्यात कुठल्याही प्रकारचा धार्मिक, जातीय संघर्ष झाल्याचे दिसत नाही. मुक्ती संघर्ष चळवळीच्या प्रयत्नामुळेच बलवडी-तांदुळवाडी ही गावे राष्ट्रीय एकात्मतेची आदर्श खेडी म्हणून उदयाला आली आहेत. म.गांधींना अभिप्रेत असलेले स्वराज्याचे स्वप्न काही अंशाने या खेडयांनी पूर्ण केले असे म्हणायला हरकत नाही.

12. **येरळेचा वाळू लढा :-**

मुक्ती संघर्ष चळवळीने उभारलेल्या येरळेच्या वाळू लढयाने देशात एक नवा अध्याय सुरू झाला. नद्यांमधील वाळू ही निसर्ग संपत्ती. या निसर्ग संपत्तीवर अधिकार शासनाचा. त्यामुळे या सरकारी संपत्तीची मालकी सरकारी अधिका-यांकडे असते. परंतु हा अधिकारी वर्गच जेव्हा या निसर्ग संपत्तीचा भक्षक बनतो तेव्हा पर्यावरण संतुलनासाठी

सामान्य जनतेला रस्त्यावर यावे लागते· हे येरळेच्या वाळूलढयाने दाखवून दिले·

येरळेच्या पात्रातील वाळू तहसीलदार कार्यालयातून लिलाव काढून विकली जाते· वाळू विक्रीतले इंगीत माहीत असणा-या कंत्राटदारांनी बोलीप्रमाणे पैसे भरुन ठराविक मापाची वाळू उचलण्याचे परवाने घेतले होते· परंतु या कंत्राटदारांनी मापाप्रमाणे वाळू न उचलता सरकारी अधिका-यांच्या संगनमताने बेसुमार वांळू उपसली· या वाळूच्या धंद्यातून अनेक कंत्राटदार गब्बर झाले· परंतु बेसुमार वाळू उपसा झाल्यामुळे नदीच्या पात्रात वाळूत अडकून राहणारे पाणी नष्ट झाले· पाणी अडवून ठेवण्याची येरळेची क्षमता संपुष्टात येवू लागली· ही अशीच परिस्थिती कायम राहिली तर येरळे काठच्या गावांनासुध्दा आज पिण्याचा पाण्याचा प्रश्न अवघड बनला तो अधिकच गंभीर होवून जगणेही अशक्य होईल· वाळू विकून संपल्यावर तेवढी वाळू पुन्हा पात्रात भरण्याची कुवत आज निसर्गात नाही· वाळू पण संपणार आणि पाणी पण संपणार· पावसाचे पाणी सरळ कृष्णेला जाणार त्यामुळे नैसर्गिक साधन संपत्तीची चाललेली ही नासधूस थांबविण्यासाठी "वाळू विक्रीला" चळवळीने विरोध केला· तहसीलदार कचेरीवर मोर्चे नेले, पर्यावरण संतुलन राखण्यासाठी वाळू विक्री करु नये, वाळूसारख्या उपलब्ध नैसर्गिक साधन संपत्तीवर स्थानिक लोकांचा हक्क असला पाहिजे, त्यासाठी वाळूची विक्री लिलावाने न करता रॉयल्टी पध्दतीने करावी, तसेच वाळू विक्रीचे परवाने कंत्राटदारांना न देता दुष्काळ निर्मूलनाची कामे करणा-या संघटनेस द्यावीत· अशा प्रकारच्या मागण्या केल्या· परंतु शासनाने या मागण्यांचा विचार तर केलाच नाही उलट वाळू विक्रीचे लिलाव पुकारुन कष्टक-यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचा प्रयत्न केला· तेव्हा कष्टकरीही पेटून उठले· आपापल्या शिवारात नदीच्या पात्रात उभे राहून वाळू कंत्राटदारांना वाळू उपसण्यास बंदी केली· कंत्राटदारांनी गुंड आणून वाळू उपसण्याचा प्रयत्न केला· परंतु चळवळीच्या रेटयामुळे तो पूर्णपणे फसला· चळवळीने बळीराजा धरणाच्या संदर्भात वाळू परवाने मिळावेत म्हणून आंदोलन केले· शासनाला चळवळीच्या प्रखर आंदोलनामुळे वाळू विक्री परवाने द्यावे लागले आणि या प्रकारे उपलब्ध नैसर्गिक साधन संपत्तीवर स्थानिक लोकांची मालकी प्रस्थापित करण्यात चळवळ यशस्वी झाली·

या पध्दतीने मुक्ती संघर्ष चळवळीने समाजाच्या उन्नतीसाठी, प्रगतीसाठी विधायक भूमिका स्वीकारुन राजकीय पक्षापेक्षा आपले वेगळेपण दाखवून दिले·

राजकीय पक्ष आणि त्यामध्ये प्रामुख्याने डावे व पुरोगामी विचारांचे पक्षसुध्दा जनतेच्या प्रश्नांशी निगडीत आहेत. परंतु राजकीय पक्षांच्या कार्याला काही प्रमाणात मर्यादा आहेत. या पक्षांचे कार्य म्हणजे जनतेच्या प्रश्नांसाठी चळवळ करणे, राजकीय जागृती करणे, निवडणुका लढवून सत्ता प्राप्तीचा प्रयत्न करणे, जनतेवरील अत्याचाराला वाचा फोडणे, जनतेमध्ये एक वैचारिक बैठक निर्माण करणे, जनतेला राजकीय शिक्षण देणे, संघटना बळकट करणे या प्रकारचे ठराविक साच्याचे चौकटीबंध स्वरूपाचे असते. या चौकटीच्या पूर्णपणे बाहेर राहून जनतेचे नेहमीचे अन्न, वस्त्र, निवारा हे ज्वलंत प्रश्न हाती घेवून कष्टकरी जनतेला स्वावलंबी व निर्भर बनविण्याचे कार्य या चळवळीने हाती घेतले आहे. कोणत्याही प्रकारच्या राजकीय सत्तेशी, आर्थिक लाभाची अपेक्षा न ठेवता अत्यंत तळमळीने, दृढ निर्धाराने कष्टकरी जनतेसाठी स्वावलंबी विकासाचे कायमस्वरूपी कार्य करण्याचे सेवाव्रत या चळवळीने स्वीकारले आहे. त्यामुळेच या चळवळीने सांगली जिल्हयात उल्लेखनीय प्रभाव पाडून स्वतःचे वेगळे आणि वैशिष्टयपूर्ण अस्तित्व टिकविले आहे.

## xxx संदर्भ xxx

1· जोशी लक्ष्मणशास्त्री, "यशवंतराव चव्हाण : संपन्न व्यक्तिमत्वाचा आदर्श", यशवंतराव राष्ट्रीय व्यक्तिमत्व, भा·कृ·केळकर §संपा§, मुंबई, 1985, पृ·3

2· दै·सकाळ, "यशवंतराव व खानापूर तालुका", खानापूर तालुका पुरवणी, कोल्हापूर, दि·28 फेब्रुवारी 1994, पृ·4

3· पाटणकर भारत यांच्या दि·11/12/93 रोजीच्या प्रकट मुलाखतीवरून उद्धृत·

4· श्रीमती पाटणकर इंदुताईच्या दि·11/12/93 रोजीच्या प्रकट मुलाखतीवरून उदधृत·

5· पाटणकर भारत यांच्या दि·11/12/93 रोजीच्या प्रकट मुलाखतीवरून उद्धृत·

6· ठोके मो·नि·, "श्रमिकांचा कैवारी", पारख प्रकाशन, बेळगाव, 1983, पृ·194·

7· कदम दत्तात्रय रामचंद्र, "बलवडी क्रांतिस्मृतिवन" खानापूर तालुका विशेष पुरवणी, दै·सकाळ, कोल्हापूर, दि·28 फेब्रुवारी 1994, पृ·9

8· पाटणकर भारत व पवार संपतराव, "बळीराजा स्मृती धरण" माहिती पुस्तिका, पृ·3

9· श्रीमती पाटणकर इंदुताईच्या दि·11/12/93 च्या प्रकट मुलाखतीवरून उद्धृत·

10· पाटणकर भारत यांच्या दि·11/12/93 च्या प्रकट मुलाखतीवरून उद्धृत·

11· *Thukral E.G. and Sakate M.D,, 'Baliraja A People's Alternative', Big Dams - Displaced People, New Delhi, 1992, Page 146*

12· पाटणकर भारत व पवार संपतराव, उ·नि· पृ·4 व 5

13· तत्रैव, उ·नि·, पृ·4 व 5

14· तत्रैव, उ·नि·, पृ·4 व 5

15· मुक्ती संघर्ष चळवळ, "आसूड" विटा, 1985, पृ·2

16· तत्रैव, मुखपृष्ठाच्या आतील पान

17· मुक्ती संघर्ष चळवळ, "कृष्णा-कोयना उपसा जलसिंचन योजना" §ताकारी योजना§ पृ·55

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

18· दै·सकाळ, कोल्हापूर, दि·27/12/1990

19· मुक्ती संघर्ष चळवळ, उ·नि·, पृ·27

20· तत्रैव, पृ·48

21· श्रीमती पाटणकर इंदुताईंच्या दि·11/12/93 च्या प्रकट मुलाखतीवरून उद्धृत·

22· उ·नि·मुलाखतीवरून उद्धृत·